मंगळवार दि. ११ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## कामगारांच्या ‘जेल भरो’चा जालन्यात एल्गार; शेकडो आंदोलकांना पोलिसांकडून अटक

### चार श्रमसंहिता रद्द करण्यासह २०० दिवस रोजगार, ७०० रुपये रोजंदारी, किमान ३० हजार वेतनाची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारच्या कामगारविरोधी, शेतकरीविरोधी आणि जनविरोधी धोरणांचा निषेध करत चार कामगारविरोधी श्रमसंहिता रद्द करण्यासह विविध मागण्यांसाठी जालन्यात कामगार संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला. केंद्रीय कामगार संघटना संयुक्त कृती समिती आणि संयुक्त किसान मोर्चाच्या निर्णयानुसार जालना जिल्हा परिषद कार्यालयावर ‘जेल भरो’ आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात , शेतमजूर युनियनसह कामगार, शेतकरी, शेतमजूर, महिला, योजना कर्मचारी आणि असंघटित कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान आंदोलकांनी सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनाची तीव्रता वाढल्यानंतर पोलिसांनी शेकडो कार्यकर्त्यांना ताब्यात घेत अटक केली. त्यामुळे जिल्हा परिषद परिसरात काही काळ आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले होते.

**‘कामगारविरोधी श्रमसंहिता रद्द करा’चा जोरदार नारा**

केंद्र सरकारने लागू केलेल्या चार श्रमसंहितांमुळे कामगारांचे कायदेशीर हक्क, रोजगाराची सुरक्षितता, वेतन, सामाजिक सुरक्षा तसेच संघटित होण्याच्या अधिकारावर प्रतिकूल परिणाम होणार असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

कामगारांच्या विद्यमान संरक्षणात्मक कायद्यांचे स्वरूप बदलून उद्योगांना अधिक





सवलती देण्याच्या दिशेने धोरणे राबविली जात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. त्यामुळे चारही श्रमसंहिता तातडीने रद्द करून कामगारांचे पूर्वीचे कायदेशीर संरक्षण कायम ठेवावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

**महागाई, बेरोजगारी आणि कंत्राटीकरणावर सरकारला घेरले**

आंदोलनात केवळ श्रमसंहितेचा मुद्दा न राहता महागाई, बेरोजगारी, कंत्राटीकरण, कामगारांच्या हक्कांवरील आक्रमण आणि सामाजिक सुरक्षेतील कपात या प्रश्नांवरही सरकारचा निषेध करण्यात आला. शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी जनतेच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करत आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. वाढती महागाई आणि बेरोजगारीमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले असून युवकांसाठी पुरेशा रोजगाराच्या संधी निर्माण होत नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला.

**योजना कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कर्मचारी दर्जाची मागणी**

अंगणवाडी सेविका-मदतनीस, आशा, गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचारी तसेच विविध योजनांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कर्मचारी दर्जा देण्याची मागणी करण्यात आली.

या कर्मचाऱ्यांना, आणि पेन्शनचा लाभ मिळावा, अशी मागणीही आंदोलकांनी केली. आशा व गटप्रवर्तकांना मानधनाची पे-स्लिप देण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

मनरेगेत २०० दिवस काम आणि ७०० रुपये रोजंदारी ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रमुख आधार असलेल्या मनरेगा योजनेबाबतही आंदोलकांनी सरकारसमोर मागण्या मांडल्या.

मनरेगा कायदा पूर्ववत लागू करावा, केंद्राने केलेली ४० टक्के अर्थसंकल्पीय कपात रद्द करावी, प्रत्येक कुटुंबाला वर्षातून २०० दिवस काम आणि दररोज ७०० रुपये मजुरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

भूमिहीन कुटुंबांना शेतीचे वाटप करावे तसेच अनेक वर्षांपासून ताब्यात असलेली गायरान जमीन संबंधितांच्या नावे करावी, अशी मागणीही करण्यात आली.

**भूमिहीन शेतमजुरांसाठी ‘मजूर सन्मान धन’ची मागणी**

भूमिहीन शेतमजूर कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून त्यांच्यासाठी दरवर्षी १२ हजार रुपये ‘मजूर सन्मान धन’ सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली. त्याचबरोबर शेतीमालाला स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार -२ + ५० टक्के या सूत्रानुसार हमीभाव देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. उत्पादन खर्च वाढत असताना शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य मोबदला मिळत नसल्याने शेती क्षेत्रातील आर्थिक संकट वाढत असल्याचा मुद्दा आंदोलकांनी उपस्थित केला. स्मार्ट मीटरला विरोध; ग्रामीण भागात २४ तास वीजपुरवठ्याची मागणी ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याच्या प्रश्नावरही आंदोलनातून सरकारला लक्ष्य करण्यात आले.

स्मार्ट मीटर योजना रद्द करावी, गावठाण फिडरवरील लोडशेडिंग बंद करावे आणि ग्रामीण भागाला २४ तास अखंड घरगुती वीजपुरवठा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि लघुउद्योगांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

**कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत घेण्याची मागणी**

खासगी उद्योग तसेच शासकीय विभागांमध्ये कंत्राटी, शिकाऊ आणि इतर स्वरूपात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत घ्यावे, अशी मागणी करण्यात आली.

समान कामाला समान वेतन लागू करावे तसेच सर्व कायदेशीर आणि सामाजिक सुरक्षा लाभ द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली. आठ तासांच्या कामासाठी किमान ३० हजार रुपये मासिक वेतन निश्चित करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

**असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र सामाजिक सुरक्षा कायदा**

असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांना रोजगाराची स्थिरता आणि सामाजिक सुरक्षेचा पुरेसा आधार नसल्याचा मुद्दा आंदोलनात मांडण्यात आला.

असंघटित कामगारांसाठी स्वतंत्र सामाजिक सुरक्षा कायदा लागू करावा, सर्व कल्याणकारी मंडळे प्रभावीपणे कार्यान्वित करावीत आणि त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी करण्यात आली.

**नीट पेपरफुटीची चौकशी करण्याची मागणी**

शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रश्नही आंदोलनाच्या मागण्यांमध्ये समाविष्ट करण्यात आला. परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षांमध्ये गैरप्रकारांना थारा मिळू नये आणि गुणवत्तेच्या आधारावर विद्यार्थ्यांना संधी मिळावी, यासाठी परीक्षा व्यवस्थेत आवश्यक सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली. *(पान २ वर)*

## जालन्यात तलवारींचा साठा जप्त; ४१ घातक शस्त्रांसह एकाला अटक

### २२ धारदार तलवारी, १५ खंजीर आणि ४ चॉपरचा समावेश; विक्रीसाठी साठवणूक केल्याचा पोलिसांचा दावा, दुसऱ्या संशयिताचा शोध सुरू

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असतानाच चंदनझिरा पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ४१ घातक धारदार शस्त्रे जप्त केली आहेत. सुंदरनगर परिसरातील एका घरावर छापा टाकून पोलिसांनी २२ तलवारी, १५ धारदार खंजीर आणि ४ चॉपर, असा एकूण सुमारे १ लाख ३४ हजार रुपये किमतीचा शस्त्रसाठा जप्त केला.

ही शस्त्रे बेकायदेशीररीत्या विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवण्यात आल्याचा



पोलिसांचा दावा असून, या प्रकरणात शेख माजेद शेख लतिफ (वय २३, रा. राबिया मशीदच्या मागे, डायमंड हॉलजवळ, सुंदरनगर, चंदनझिरा) याला अटक करण्यात आली आहे. त्याचा कथित साथीदार इम्राण ऊर्फ इम्मा सलीम शेख (रा. इंदिरानगर, जालना) याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

या कारवाईमुळे शहरात अवैध शस्त्रांचा साठा करून त्यांची विक्री करणाऱ्या साखळीबाबत प्रश्न निर्माण झाले असून, पोलिसांच्या पुढील तपासात या शस्त्रांचा स्रोत आणि संभाव्य खरेदीदारांची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

**रेकॉर्डवरील गुन्हेगाराच्या हालचालींवर पोलिसांची नजर**

जालना शहरात गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु यांनी शहरातील अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या आणि गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्या व्यक्तींविरुद्ध कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर चंदनझिरा पोलिसांनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या हालचालींवर विशेष लक्ष केंद्रित केले होते. नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी अधिकारी आणि अंमलदारांना अशा व्यक्तींवर निगराणी ठेवण्याच्या सूचना केल्या होत्या.

त्याचदरम्यान पोलिसांच्या निगराणीखाली असलेल्या शेख माजेद शेख लतिफ याच्या हालचाली संशयास्पद असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

**खबऱ्याच्या माहितीतून शस्त्रसाठ्याचा सुगावा**

शेख माजेद याच्याबाबत पोलिसांनी खबऱ्याच्या माध्यमातून अधिक माहिती गोळा केली. तो आपल्या राहत्या घरात धारदार तलवारी, खंजीर आणि चॉपर ठेवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

ही शस्त्रे शहरात गंभीर स्वरूपाचे बेकायदेशीर कृत्य करण्यासाठी तसेच लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने विक्री करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तिची खातरजमा केली. *(पान २ वर)*

## भारतीय तिरंगा यात्रा केवळ रॅली नसून देशप्रेमाची भावना - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

भारतीय तिरंगा आज आपण हातात घेतला असला तरी तो आपल्या मनामध्ये आहे. भारतीय संविधानाचा सन्मान, देशाचा स्वाभिमान आणि राष्ट्रभावना आपल्या अंतः करणात आहे. नवभारत घडविण्याची जबाबदारी आता प्रत्येक नागरिकाची आहे. ही जबाबदारी आपण पार पाडली तरच हातातील तिरंग्याला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होईल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. तिरंगा यात्रा ही केवळ एक रॅली नसून देशप्रेमाची भावना जागृत करणारा उपक्रम असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वरळी सी फेस येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘राष्ट्र प्रथम तिरंगा उत्सव’ रॅलीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी तिरंग्याचे महत्त्व अधोरेखित करत देशाच्या विकासाचा आणि नवभारताच्या संकल्पनेचा उल्लेख केला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, सर्वश्री आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, योगेश सागर, मिहिर कोटेचा, कॅप्टन तमिळ सेल्वन, राजहंस सिंह, प्रवीण *(पान २ वर)*

## जाफराबाद बनले ‘जागतिक मिरची हब’; रोज ५०० टनांहून अधिक हिरव्या मिरचीची उलाढाल

### *कोट्यवधींची दैनंदिन उलाढाल; बांगलादेश, श्रीलंका, सौदी अरेबिया, नेपाळसह देश-विदेशात जाफराबादच्या मिरचीची मागणी*

**जाफराबाद । दत्ता देशमुख**

जालना जिल्ह्यातील जाफराबाद शहराची ओळख आता केवळ तालुक्याचे ठिकाण म्हणून राहिलेली नाही. भोकरदन रोडलगत पुनर्वसन परिसराच्या बाजूला दहा एकरांहून अधिक जागेत भरत असलेली हिरव्या मिरचीची बाजारपेठ सध्या राज्यातील प्रमुख मिरची बाजारपेठांपैकी एक म्हणून वेगाने पुढे येत आहे. दररोज तब्बल ५०० टनांहून अधिक हिरव्या मिरचीची खरेदी-विक्री होत असल्याने या बाजारपेठेची व्याप्ती स्थानिक मर्यादा ओलांडून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडली गेली आहे.

महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून व्यापारी



जाफराबादमध्ये मिरची खरेदीसाठी दाखल होतात. येथून खरेदी झालेली मिरची दिल्ली, मुंबई, गुजरात, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, सुरत, कोलकाता, चेन्नई, छत्रपती संभाजीनगर, पुणे, बंगळुरू, अहमदाबाद, हैदराबाद, आग्रा आदी देशांतर्गत बाजारपेठांमध्ये पाठविली जाते. त्याचबरोबर बांगलादेश, श्रीलंका, सौदी अरेबिया आणि नेपाळ यांसारख्या देशांमध्येही मिरचीची पाठवणूक होत असल्याचे व्यापारी सांगतात.

**रोज ५० ते ६० मोठे ट्रक रवाना**

जाफराबादच्या मिरची बाजारात दररोज मोठ्या प्रमाणावर आवक होते.

एका मोठ्या ट्रकमध्ये साधारण १०० ते १५० क्विंटल मिरची भरली जाते. बाजारातून दररोज सुमारे ५० ते ६० मोठे ट्रक विविध ठिकाणी रवाना होत असल्याने बाजारपेठेत दिवसभर शेतकरी, व्यापारी, हमाल, वाहतूकदार आणि खरेदीदारांची मोठी वर्दळ पाहायला मिळते.

दररोज होणाऱ्या मोठ्या आवक-जावक आणि खरेदी-विक्रीमुळे बाजारपेठेत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. या व्यवहाराचा थेट परिणाम जाफराबाद शहराच्या अर्थव्यवस्थेवर होत असून, हॉटेल, ढाबे, किराणा, कापड दुकाने, वाहन दुरुस्ती, वाहतूक, हमाली तसेच इतर छोट्या-मोठ्या व्यवसायांनाही त्याचा फायदा होत आहे.

*(पान २ वर)*

## बांधकाम कामगार उपायुक्त अमोल जाधव अटकेत; कोट्यवधींच्या साहित्य घोटाळ्याला मोठा ट्विस्ट!..

### लाभार्थ्यांना वाटप होणारे संसारोपयोगी साहित्य परस्पर विकल्याचा आरोप; फिर्याद देणाराच निघाला आरोपी..

**परतूर - प्रतिनिधी**

बांधकाम कामगारांसाठी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या संसारोपयोगी साहित्याच्या संचामध्ये कथित कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी परतूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात बांधकाम कामगार विभागाचे उपायुक्त अमोल जाधव यांना पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे, या गैरव्यवहाराची फिर्याद पोलिसांत दाखल करणारे जाधवच तपासादरम्यान आरोपी ठरल्याने या प्रकरणाला मोठा धक्कादायक ट्विस्ट मिळाला आहे. जालना जिल्हा बांधकाम कामगार अधिकारी म्हणून कार्यरत असताना अमोल जाधव यांनी बांधकाम कामगारांना वाटप करण्यात येणाऱ्या संसारोपयोगी



साहित्याच्या संचामध्ये गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. जवळपास १०० ट्रक साहित्याचे संच लाभार्थ्यांना वितरित न करता ते खासगी व्यक्तींना विकण्यात आल्याचा आरोप पोलिस तपासात समोर आला आहे. या प्रकरणातील गैरव्यवहाराची माहिती समोर आल्यानंतर काही दिवसांपूर्वी अमोल जाधव यांनी स्वतःच परतूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. तपासादरम्यान साहित्याच्या व्यवहारासह अन्य बाबींची चौकशी करण्यात आली असता जाधव यांचीच भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आली.

त्यानंतर पोलिसांनी कारवाई करत अमोल जाधव यांना अटक केली. त्यामुळे स्वतःच गैरव्यवहाराची फिर्याद देणारा अधिकारीच आरोपी झाल्याने बांधकाम कामगार विभागात आणि प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत सुमारे १ कोटी ७९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती आहे. साहित्य नेमके कोणाला विकण्यात आले, या व्यवहारामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, तसेच या गैरव्यवहाराची व्याप्ती किती आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

या प्रकरणात आणखी काही मोठी नावे समोर येणार का? गैरव्यवहाराची रक्कम नेमकी किती? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय...

## विलीनीकरणाला मंजुरी मिळाली; पण जालना मर्चंटस् बँकेच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली का?

५४ कोटींच्या नुकसानीपासून ठेवीदारांच्या पैशांपर्यंत आणि सभासदांच्या भवितव्यापासून जबाबदारी निश्चितीपर्यंत विलीनीकरण हा उपाय, पण उत्तरदायित्वाचा प्रश्न कायम आहे.

मोतीराम अग्रवाल जालना मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नाशिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेत प्रस्तावित विलीनीकरणाला सर्वसाधारण सभेने एकमताने मंजुरी दिली. आर्थिक अडचणींच्या गर्तेत सापडलेल्या बँकेसाठी हा निर्णय निश्चितच महत्त्वाचा टप्पा आहे. ठेवीदारांचे हित, बँकेचे भवितव्य आणि व्यवहारांना स्थैर्य मिळावे, या उद्देशाने विलीनीकरणाचा मार्ग स्वीकारला जात असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे.

परंतु येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतोविलीनीकरणाला मंजुरी मिळाली म्हणजे जालना मर्चंटस् बँकेशी संबंधित सर्व प्रश्न संपले का? उत्तर अर्थातच 'नाही' असेच आहे. कारण सर्वसाधारण सभेतच बँकेला झालेल्या सुमारे ५४ कोटी रुपयांच्या नुकसानीचा मुद्दा समोर आला. या नुकसानीमागे अनियमितता झाल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आणि कायदेशीर कार्यवाही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. मात्र, बँकेला एवढा मोठा आर्थिक फटका बसला असेल तर सभासदांचा स्वाभाविक प्रश्न आहेही अनियमितता नेमकी कशी घडली? जबाबदार कोण? नियंत्रण यंत्रणा कुठे कमी पडली? आणि जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर आहे? विलीनीकरणाच्या निर्णयाइतकाच हा प्रश्न महत्त्वाचा आहे. विलीनीकरण म्हणजे जबाबदारीचा शेवट नव्हे. सहकारी बँक ही केवळ संचालक मंडळाची संस्था नसते. ती हजारो सभासद, ठेवीदार, ग्राहक आणि कर्मचाऱ्यांच्या विश्वासावर उभी असते. त्या विश्वासाला धक्का बसला तर केवळ आर्थिक आकडे पुरेसे उत्तर ठरत नाहीत.

बँकेला आर्थिक नुकसान झाले, त्यानंतर नियामक निर्बंध आले आणि आता दुसऱ्या बँकेत विलीनीकरणाचा निर्णय घेतला जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेत 'नुकसान भरून काढण्यासाठी पुढे काय?' याबरोबरच 'नुकसान होऊ दिले कोणी?' हा प्रश्नही विचारला गेला पाहिजे. विलीनीकरण हा आर्थिक पुनर्रचनेचा मार्ग असू शकतो; मात्र तो भूतकाळातील उत्तरदायित्व झाकण्याचा पर्याय होऊ नये. कायदेशीर चौकशी सुरू असेल तर तिचा निष्कर्ष काय? दोष निश्चित झाले असल्यास पुढील कारवाई काय? आणि बँकेच्या नुकसानीची वसुली करण्यासाठी कोणती पावले उचलली जात आहेत? या प्रश्नांची पारदर्शक उत्तरे सभासदांना मिळणे आवश्यक आहे. सभेत पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी असलेल्या ठेवीदारांना आतापर्यंत ९३ कोटी रुपये अदा केल्याची माहिती देण्यात आली. आणखी १४ कोटी रुपये मंजूर झाले असले तरी त्यांचे वाटप बाकी असल्याचे सांगण्यात आले.

ही माहिती ठेवीदारांसाठी दिलासादायक असली तरी पुढचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. उर्वरित ठेवीदारांचे काय? ज्यांचे क्लेम फॉर्म प्रलंबित आहेत, त्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. परंतु आर्थिक संकटाचा फटका बसलेल्या ठेवीदारांना केवळ अर्ज करण्याचे आवाहन पुरेसे नाही. संपूर्ण प्रक्रिया किती पारदर्शक आहे, किती रक्कम कोणत्या टप्प्यावर उपलब्ध आहे आणि उर्वरित दाव्यांची पूर्तता कशा पद्धतीने होणार आहे, याची स्पष्ट माहिती आवश्यक आहे. ठेवीदारांच्या पैशांबाबत वेळापत्रक, प्रक्रिया आणि जबाबदार यंत्रणा स्पष्ट केली गेली तरच विश्वास पुनर्स्थापित होईल. बँकेच्या व्यवहारांवर रिझर्व्ह बँकेचे निर्बंध असल्याचे सभेत सांगण्यात आले. यामुळेच विलीनीकरणाचा निर्णय कोणत्या आर्थिक आणि नियामक परिस्थितीत घेतला जात आहे, याचे महत्त्व वाढते.

पान १ व ४ वरुन...

## कामगारांच्या 'जेल भरो'...

**जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधानांना निवेदन**

आंदोलकांच्या वतीने भारत सरकारच्या पंतप्रधानांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये कामगार, शेतकरी, शेतमजूर, योजना कर्मचारी, असंघटित कामगार आणि युवकांच्या विविध प्रश्नांचा समावेश करण्यात आला.

चार श्रमसंहिता रद्द करण्यापासून ते रोजगार, वेतन, सामाजिक सुरक्षा, वीज, मनरेगा, शेतमालाचा हमीभाव, भूमिहीनांना जमीन आणि परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता अशा विविध मागण्यांकडे सरकारने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

**शेकडो कार्यकर्त्यांना अटक**

जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलनासाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते एकत्र आले. घोषणाबाजी आणि निदर्शनांनंतर आंदोलनकर्त्यांनी 'जेल भरो'ची भूमिका घेतली. त्यानंतर पोलिसांनी आंदोलनात सहभागी झालेल्या शेकडो कार्यकर्त्यांना ताब्यात घेत अटक केली.

पोलिसांच्या कारवाईदरम्यान आंदोलनस्थळी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असले तरी आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्यांवर ठाम राहत सरकारविरोधात घोषणाबाजी सुरू ठेवली.

कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा मोठा सहभाग

आंदोलनात सिटूचे अण्णा सावंत, मधुकर मोकळे, मारोती खंदारे, सरिता शर्मा, अनिल मिसाळ, कल्पना मिसाळ, वैजिनाथ लोंढे, भगवान कोळे, कांचन वाहुळे, हरिश्चंद्र लोखंडे, सुजाता छडीदार, लता वीर, सावित्रा इस्तापे, रवी भदर्गे, चंपाबाई दाभाडे, शेषराव कान्हेरे, योगेश फुसे, लक्ष्मण मोहिते, कृष्णा काटकर, संजय जाधव, लक्ष्मण पंडित, मंगल साबळे, मिरा पुंगळे, प्रतिभा आहेर, अशोक साळवे, गोविंद चांदगुडे, संतराम बुरकूल, यादवराव दिघे यांच्यासह , शेतमजूर युनियन आणि विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**सरकारसमोर मागण्यांचा पाढा**

कामगारविरोधी श्रमसंहिता रद्द करणे, किमान वेतन वाढवणे, कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत घेणे, योजना कर्मचाऱ्यांना कर्मचारी दर्जा देणे, मनरेगेला बळकटी देणे, भूमिहीनांना जमीन, शेतमालाला -२ + ५० टक्के सूत्रानुसार हमीभाव, स्मार्ट मीटर योजना रद्द करणे, ग्रामीण भागाला २४ तास वीज, असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा आणि युवकांना रोजगार अशा मागण्यांचा एकत्रित आवाज या आंदोलनातून बुलंद करण्यात आला.

कामगार, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांवर सरकारने ठोस निर्णय घेतला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देत 'जेल भरो' आंदोलनातून संघटनांनी आपली ताकद दाखवून दिली.

## जालन्यात तलवारींचा...

माहितीची पडताळणी केल्यानंतर ९ ऑगस्ट २०२६ रोजी पोलिसांनी कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

**सुंदरनगरातील घरावर छापा; घरातून ४१ शस्त्रे बाहेर**

उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या सूचना व मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने सुंदरनगर परिसरातील शेख माजेद याच्या घरावर छापा टाकला.

घराची झडती घेतली असता पोलिसांना मोठ्या प्रमाणावर धारदार शस्त्रांचा साठा आढळून आला. झडतीमध्ये

२२ धारदार तलवारी १५ धारदार खंजीर ४ धारदार चॉपर

अशी एकूण ४१ घातक शस्त्रे जप्त करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार या शस्त्रांची अंदाजे किंमत १ लाख ३४ हजार रुपये आहे.

एकाच ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात धारदार शस्त्रे आढळून आल्याने चंदनझिरा पोलिसांच्या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**शस्त्रे कुठून आली? कोणाला विकली? तपासाचा केंद्रबिंदू**

पोलिसांनी शेख माजेद याला अटक केली असून, त्याला १२ ऑगस्ट २०२६ पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

या कालावधीत पोलिसांकडून त्याची सखोल चौकशी करण्यात येत आहे. जप्त करण्यात आलेली शस्त्रे कुठून आणण्यात आली, कोणाकडून खरेदी करण्यात आली, यापूर्वी या शस्त्रांपैकी काही शस्त्रे कोणाला विकण्यात आली का, तसेच या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

त्यामुळे या प्रकरणाचा तपास केवळ जप्त केलेल्या शस्त्रांपुरता मर्यादित न राहता त्यामागील पुरवठा साखळीपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

**दुसऱ्या संशयिताचा शोध**

या प्रकरणात शेख माजेदचा कथित साथीदार इम्राण ऊर्फ इम्मा सलीम शेख याचेही नाव समोर आले आहे. तो इंदिरानगर, जालना येथील रहिवासी असून पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात आहे. शस्त्रसाठा करण्याच्या आणि त्याची विक्री करण्याच्या कथित व्यवहारात आणखी व्यक्ती सहभागी आहेत का, याचाही तपास पोलिस करीत आहेत.

**दोन्ही संशयितांविरुद्ध यापूर्वीही गुन्हे**

पोलिसांच्या माहितीनुसार, शेख माजेद आणि इम्राण हे दोघेही रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. त्यांच्या विरोधात जालना शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये खून, खुनाचा प्रयत्न, मारामारी, गंभीर दुखापत, दंगा आणि अवैधरीत्या शस्त्र बाळगणे अशा स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींकडून मोठ्या प्रमाणावर धारदार शस्त्रांचा साठा आढळून आल्याने पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे.

**संघटित गुन्हेगारीचा संशय; कलम १११ अंतर्गत कारवाई**

आरोपी गुन्हे करताना संघटितपणे एकत्र येत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानुसार संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम १११ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

या कलमांतर्गत करण्यात आलेल्या कारवाईमुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले असून, संबंधित व्यक्तींच्या गुन्हेगारी नेटवर्कचा तपास करण्याच्या दृष्टीनेही पोलिस तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले.

**शहरातील अवैध शस्त्रसाठ्यावर पोलिसांची नजर**

जालना शहरात गेल्या काही काळात गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर अवैध शस्त्रांचा प्रश्न पोलिसांसमोर आव्हान ठरत आहे. त्यामुळे शस्त्रे बाळगणारे, त्यांची विक्री करणारे किंवा गुन्हेगारी कारवायांसाठी शस्त्रांचा वापर करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

चंदनझिरा पोलिसांची ही कारवाई त्याच मोहिमेचा एक भाग मानली जात आहे. विशेष म्हणजे, विक्रीच्या उद्देशाने शस्त्रे साठवून ठेवली असल्याचा पोलिसांचा दावा असल्याने आता या शस्त्रांचा वापर किंवा संभाव्य व्यवहार याबाबत तपासात काय निष्पन्न होते, याकडे लक्ष लागले आहे.

**पोलीस पथकाचे उल्लेखनीय काम**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक रवि देशमाने, सहायक फौजदार राजेंद्र ठाकूर, पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, अभिजीत वायकोस, शरद पवार, मदन बहुरे, विजय बहुरे, राजेंद्र पवार, पोलीस कॉन्स्टेबल सुनिल पगार, सागर खैरे, नवनाथ पाटील तसेच महिला पोलीस मधु जयाती यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**शस्त्रसाठ्याच्या मागे नेमके कोण?**

एकाच घरातून ४१ धारदार शस्त्रे जप्त झाल्याने आता या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे हा शस्त्रसाठा नेमका कुठून आला आणि तो कोणत्या नेटवर्कमार्फत जालना शहरात आणला जात होता?

शेख माजेदच्या पोलीस कोठडीदरम्यान होणाऱ्या चौकशीत शस्त्रांचा पुरवठादार, संभाव्य खरेदीदार आणि या व्यवहाराशी संबंधित इतर व्यक्तींची माहिती उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे चंदनझिरा पोलिसांच्या या कारवाईनंतर तपासाची पुढील दिशा महत्त्वाची ठरणार आहे.

## भारतीय तिरंगा...

दरेकर, प्रसाद लाड आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज मला येथे दोन सागर दिसत आहेत. एक म्हणजे समोर असलेला हिंद महासागर आणि दुसरा म्हणजे भारतीय तिरंग्याचा महासागर. ज्या तिरंग्यासाठी क्रांतिकारकांनी बलिदान दिले, सैनिकांनी सीमेवर प्राणांची आहुती दिली आणि देशवासीयांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला, तो तिरंगा जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत तोपर्यंत सदैव उंच फडकत राहील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातील चौथी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनला आहे. विविध क्षेत्रांमध्ये भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरविणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे. अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने मोठी झेप घेतली आहे,असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

भारतामध्ये जगातील दुसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम विकसित होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले., भारताकडे सर्वात मोठी युवा शक्ती आहे. तिरंगा हातात घेऊन बाहेर पडणाऱ्या या तरुणाईला थांबवण्याची ताकद जगात कोणाकडेही नाही. भारत एक मोठी महासत्ता म्हणून उदयास येत आहे. भारताची प्रगती काही शक्तींना खटकत आहे. काही परकीय शक्ती भारताची घोडदौड थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र भारताचा विकासाचा प्रवास कोणीही थांबवू शकणार नाही. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाहिलेल्या नवभारताच्या संकल्पनेतून आगामी काळात भारत विकसित राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर अग्रस्थानी दिसेल,असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. या रॅलीसाठी वरळी सी फेस येथे हजारो मुंबईकर एकत्र आले होते. तिरंगा ध्वज हातात घेतलेले नागरिक, युवक, विद्यार्थी आणि एनसीसी कॅडेट्स यांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला होता. 'भारत माता की जय', 'जय शिवाजी, जय भवानी', 'वंदे मातरम्' अशा घोषणांसह देशभक्तीपर गीतांनी वातावरण दुमदुमून गेले.

## जाफराबाद बनले...

**सुपरपासून गुंटूरपर्यंत विविध वाण**

जाफराबादच्या बाजारात हिरव्या मिरचीच्या विविध वाणांची खरेदी-विक्री होते. सुपर, मीडियम, गुंटूर, तेजस्विनी, सिमला, तलवार, शारकेन, घेवडा, बिलाडोर, तेजाफोर यांसह विविध जातींच्या मिरचीची आवक बाजारात होत आहे.

मिरचीची गुणवत्ता, आकार, रंग, ताजेपणा, आवक आणि बाजारातील मागणी यानुसार दरात चढ-उतार होत असतात. त्यामुळे एकाच दिवशी किंवा वेगवेगळ्या वाणांमध्येही दरांमध्ये मोठी तफावत दिसून येते.

**सध्याचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी**

बाजारात सध्या सुपर मिरचीला साधारण ३ हजार ते ३ हजार ५०० रुपये क्विंटल, मीडियमला सुमारे ३ हजार रुपये, गुंटूरला २ हजार ते २ हजार ५०० रुपये, तर तलवार मिरचीला सुमारे ३ हजार ५०० रुपये क्विंटल असा दर मिळत असल्याचे सांगण्यात येते.

मात्र बाजारपेठेत कोट्यवधींची उलाढाल होत असली तरी या व्यवहारातून मिरची उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी अपेक्षित उत्पन्न पडत नसल्याचे चित्र आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना बाजारभाव तुलनेने कमी असल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक गणिताचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**'सात-आठ हजार रुपये क्विंटल दर मिळाला तरच फायदा'**

''मिरचीचे रोपे लावल्यापासून तोडणीपर्यंत एकरी मोठा खर्च येतो. रोपांची किंमत, लागवड, खते, औषधे, पाणी, मल्चिंग आणि तोडणी यामुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सध्या सुपर मिरचीला तीन ते साडेतीन हजार रुपये क्विंटल दर मिळत असला तरी हा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी आहे. मिरचीला किमान सात ते आठ हजार रुपये क्विंटलपर्यंत दर मिळाल्यास उत्पादकांना काहीसा फायदा होईल. आगामी काळात मिरचीचे दर वाढतील, अशी अपेक्षा आहे. रघुनाथ पंडित, मिरची उत्पादक शेतकरी, देऊळगाव उगले मराठवाडा-विदर्भातील शेतकऱ्यांचे मोठे केंद्र

जाफराबाद बाजारपेठेची विशेष बाब म्हणजे येथे केवळ जाफराबाद तालुक्यातीलच नव्हे, तर मराठवाडा आणि विदर्भातील विविध भागांतील शेतकरी मिरची विक्रीसाठी येतात.

निमखेडा खुर्द, हिवराबळी, माहोरा, खासगाव, वरूड बु., कोनड, आंबेगाव, सिपोरा अं. यांसह परिसरातील गावांतून मोठ्या प्रमाणावर मिरचीची आवक होते. तसेच भोकरदन आणि सिल्लोड परिसरातूनही शेतकरी माल घेऊन येतात.

चांडोळ, घाड, म्हसला, दुधा यांसह बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा, जळगाव, मलकापूर आणि खान्देशातील विविध भागांतूनही उत्पादक जाफराबाद बाजारपेठेकडे वळले आहेत. त्यामुळे या बाजारपेठेचा व्याप दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे.

**देशातील प्रमुख शहरांशी थेट जोडलेली बाजारपेठ**

जाफराबादमध्ये खरेदी झालेली मिरची देशातील विविध प्रमुख बाजारपेठांकडे रवाना होते. दिल्ली, मुंबई, गुजरात, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, सुरत, कोलकाता, चेन्नई, छत्रपती संभाजीनगर, पुणे, बंगळुरू, अहमदाबाद, हैदराबाद आणि आग्रा या बाजारपेठांमध्ये जाफराबादच्या मिरचीची मागणी आहे. यामुळे जाफराबादची मिरची बाजारपेठ स्थानिक किंवा जिल्हास्तरीय बाजार न राहता राष्ट्रीय व्यापार साखळीचा भाग बनली आहे.

**परदेशातही जाफराबादच्या मिरचीची मागणी**

जाफराबाद बाजारपेठेची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे येथून मिरचीची परदेशातही पाठवणूक होते. बांगलादेश, श्रीलंका, सौदी अरेबिया आणि नेपाळ यांसारख्या देशांमध्ये जाफराबादहून मिरची जात असल्याचे व्यापारी सांगतात.

परदेशातील मागणी, देशांतर्गत मोठी बाजारपेठ आणि परिसरातील वाढती लागवड यामुळे जाफराबादच्या मिरची बाजाराला भविष्यात आणखी मोठे स्वरूप प्राप्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**दरातील चढ-उतारामुळे शेतकरी संभ्रमात**

मिरची हे नगदी पीक असले तरी त्यामध्ये बाजारभावाचा धोका मोठा आहे. आवक वाढली किंवा मागणी कमी झाली की दरात तातडीने घसरण होते. उलट बाजारात आवक कमी आणि मागणी जास्त असल्यास दर वाढतात.

सध्याच्या परिस्थितीत बाजारातील दर रोज बदलत असल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्च, वाहतूक, तोडणी आणि अपेक्षित नफा यांचे नियोजन करणे अवघड जात आहे. बाजारपेठेत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असली तरी उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव न मिळाल्यास या उलाढालीचा थेट फायदा उत्पादक शेतकऱ्यांना कितपत मिळतो, हा प्रश्न कायम आहे.**शहराच्या अर्थव्यवस्थेलाही 'मिरचीचा तडका'**

जाफराबादच्या मिरची बाजाराचा परिणाम केवळ शेतकरी आणि व्यापाऱ्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. बाहेरगावाहून दररोज शेकडो शेतकरी, व्यापारी, वाहनचालक आणि कामगार शहरात येत असल्याने स्थानिक बाजारपेठेतही ग्राहकांची संख्या वाढते.

हॉटेल, ढाबे, चहाच्या टपऱ्या, किराणा दुकाने, कापड दुकाने, वाहन दुरुस्ती केंद्रे, हमाली आणि वाहतूक व्यवसाय यांना या बाजारपेठेमुळे मोठी चालना मिळत आहे. त्यामुळे जाफराबादच्या स्थानिक अर्थचक्राला मिरची बाजारपेठेने नवी गती दिली आहे.

**व्यवस्थित सुविधांची गरज**

बाजारपेठेचा विस्तार आणि वाढती आवक लक्षात घेता भविष्यात येथे शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी अधिक नियोजनबद्ध सुविधा उपलब्ध होणे आवश्यक ठरणार आहे. वाढत्या वाहनांची संख्या, मालाची हाताळणी, साठवणूक, पॅकिंग, वाहतूक, स्वच्छता आणि बाजार व्यवस्थापन यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारण्याची गरज आहे.

जर मिरचीच्या या व्यापाराला आधुनिक पॅकिंग, शीतसाखळी, साठवणूक, प्रक्रिया उद्योग आणि निर्यात सुविधांची जोड मिळाली, तर जाफराबादला केवळ मोठी बाजारपेठ नव्हे तर मिरची प्रक्रिया आणि निर्यातीचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होण्याची संधी आहे.

**बाजार मोठा; मात्र उत्पादकाचा नफा कुठे?**

जाफराबादच्या मिरची बाजारपेठेची दिवसेंदिवस वाढणारी उलाढाल निश्चितच या परिसराच्या आर्थिक सामर्थ्याचे दर्शन घडवते. देशभरातील व्यापाऱ्यांसोबत परदेशातील बाजारपेठेशी जोडलेले हे केंद्र जाफराबादच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे ठरत आहे.

मात्र दुसरीकडे शेतकऱ्याचा उत्पादन खर्च आणि त्याला मिळणारा प्रत्यक्ष भाव यातील तफावत कायम राहिली तर कोट्यवधींच्या उलाढालीचा फायदा उत्पादकापर्यंत कितपत पोहोचतो, हा मूलभूत प्रश्न आहे. बाजारपेठेचा विस्तार होत असताना उत्पादकाला हमीभावासारखी सुरक्षितता, दर्जानुसार योग्य दर आणि साठवणुकीच्या सुविधा मिळाल्या तरच जाफराबादचा 'मिरची हब' खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांसाठीही फायदेशीर ठरेल.

जाफराबादची मिरची आता राज्याच्या सीमा ओलांडून देश-विदेशात पोहोचली आहे; या मिरचीच्या व्यापाराला शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीची जोड कधी मिळणार, हेच आता पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## छत्रपती संभाजीनगरात १४...

परंपरेचे दर्शन घडविणारा ठरणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील कलाकुसर, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि उद्योजकतेची नवी ऊर्जा एकाच छताखाली अनुभवता येणार असल्याने नागरिकांसाठी हे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरणार आहे.

## न्यायालयाची प्रतिष्ठा...

कोणत्याही निकालाशी असहमती असल्यास हिंसक किंवा अपमानास्पद मार्ग न निवडता अपील व पुनर्विलोकन याचिका यांसारख्या कायदेशीर मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहनही या मोहिमेद्वारे करण्यात येत आहे.

## जाफराबादेत काँग्रेस...

हा केवळ राजकीय पक्ष नाही. तो शेतकरी, कामगार, कष्टकरी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारी विचारधारा आहे. जनतेच्या सोडविण्यासाठी अडचणी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सातत्याने काम करीत आहेत. आगामी काळात काँग्रेस व महाविकास आघाडीची सत्ता येईल. विकास कसा करायचा हे जनतेला दाखवून देऊ, असा विश्वास दळे यांनी व्यक्त केला. यावेळी अशोक उबाळे, रऊफ परसुपारे, हरुण पठाण, विनोद सुरडकर, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख मोईज, रहीम तांबोळी, गणेश आडे, रघुनाथ पाचे, जहीर पठाण, शुभम मुळे, अहमद पठाण, बबन पाटील, अमीर मिर्झा, केशव भिसे, हनीफ कुरेशी, चांद कुरेशी, शेख रियाज, हारुण खान, संतोष खंडागळे आदी उपस्थित होते.

## तालुक्यातील वीज...

लाईट चालु ठेवावी.अशी तेथील नागरीकांची मागणी आहे. आता पावसाळा दिवस सुरू आहे, रानातील साप, विचू असे अनेक प्रकारचे विषारी किटक रात्री बाहेर निघतात. तेथे राहणा-या नागरीकांना व जनावरांच्या जीवाला धोका होऊ शकतो, रात्री दहा वाजता लाईट येते मुलांच्या अभ्यास होत नाही, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, आम्ही उपकार्यकारी अभियंता साहेब उपविभाग कार्यालय जाफराबाद यांच्या सोबत सुद्धा चर्चा केलेली आहे, त्यांनी सांगितला हा संपूर्ण महाराष्ट्राचा विषय आहे. त्यामध्ये आम्ही काही करू शकत नाही, जालना कार्यकारी अभियंता साहेब यांच्या सोबत चर्चा केली, त्यांचा हाच प्रश्न आहे की तो संपूर्ण महाराष्ट्राचा विषय आहे. त्यामध्ये आम्ही काही करू शकत नाही, तरी मा. राज साहेब ठाकरे व मनसे नेते मा.बाळा नांदगावकर यांना विनंती करण्यात येते की, आपण हि समस्या आपल्या मार्फत महाराष्ट्र शासनाकडून सोडवून घेऊन महाराष्ट्रातील सर्व शेतातील वाड्या, वस्त्या, तांडा या ठिकाणी राहणा-या नागरीकांना नाय द्यावा, अशी विनंती पंढरीनाथ म्हस्के मनसे तालुका सरचिटणीस जाफ्राबाद यांनी केली आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी प्रतिभेला पर्याय नाही ! – पवन कुलकर्णी



**पुणे - प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता लेखक, कवी, संपादक, भाषांतरकार आदी मंडळींना रिप्लेस करू शकत नाही मात्र त्याचा उपयोग करण्यामुळे आपले कसे फायदे होऊ शकतील हे, हे आपण पाहिले पाहिजे, असे अ. भा. मराठी प्रकाशक संघ व महाराष्ट्र नॉलेज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या प्रकाशकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कार्य शाळेत मार्गदर्शन करताना बोलत होते . श्री. पवन कुलकर्णी यांनी एआय वापरण्यामध्ये प्रॉम्प्टचे महत्व, अधिकाधिक चांगले प्रॉम्प्ट कसे द्यावेत आदी बाबी सांगून, शिकवून प्रॉम्प्टच्या विविध प्रकारातली फरक स्पष्ट केले. प्रॉम्प्ट देताना वापरायच्या की वड्र्सची माहिती व त्याचे महत्वही त्यांनी सांगितले. लेखक, संपादक व भाषांतरकार यांसाठी ही सर्व माहिती अतिशय उपयुक्त होती. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी कोणत्या कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते व या गोष्टी कशा प्रकारे वापरल्यास कृत्रिम बुद्धिमत्तेचा जास्तीत जास्त उपयोग करता येईल याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. याच सत्रात सहभागी मंडळींनी आपापल्या लॅपटॉपवर प्रयोग किंवा प्रात्यक्षिकही करून पाहिली.

संपादक, प्रकाशक, लेखक श्री. सुश्रुत कुलकर्णी यांनी एकूणच कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? यावर सविस्तर मार्गदर्शन केले. हे नवीन तंत्र आपल्या वयाचा विचार न करता प्रत्येकाने आत्मसात करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. हे तंत्रज्ञान नवे नसून सुमारे ८० वर्षांपासून याचा प्रवास कसा सुरू आहे हे सांगून त्यांनी सध्याच्या विविध एआय टूल्सचा परिचय करून दिला. आर्टिफिशियल इंटेलिजन्समधल्या वेगवेगळ्या प्रकारांचा फरक त्यांनी समजून दिला. यातील टोकन नावाच्या संकल्पनेची त्यांनी माहिती दिली. प्रकाशकांसाठी ही टूल्स कशा कशा प्रकारे काम करू शकतील व प्रकाशकांचे श्रम व वेळ कसा वाचवू शकतील, व हे सर्व का वापरावे या सर्व संकल्पना त्यांनी स्पष्ट केल्या.

**तिसऱ्या सत्रामध्ये सीए**

श्री. शिरीष देशपांडे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून निर्माण होणारे किंवा होऊ शकणारे धोके, त्याबाबत घ्यायची दक्षता आणि त्याबाबतचे कायदे यांची माहिती देताना हे सर्व कसे काम करते याचीही माहिती दिली. याबाबतीत कॉपीराईटचे मुद्दे , एआयने तयार केलेल्या गोष्टींबद्दलच्या जबाबदाऱ्या, वापरकर्त्याने घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर भाष्य केले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हा कामांमध्ये पन्नास टक्केच करावा असे सुचवून आजकाल जे ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार होत आहेत त्यातून वाचण्याचे दृष्टीने काय काय काळजी घ्यावी याबाबतही माहिती दिली.

प्रकाशक संघाच्या कार्यकारिणी सदस्य सौ. अमृता कुलकर्णी यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये प्रकाशक संघ साहित्य क्षेत्रातील विविध घटकांसाठी करत असलेल्या कार्याचा परिचय करून देत प्रकाशकांच्या दृष्टीने आजच्या कार्यशाळेचे असलेले महत्त्व सांगितले. कार्यकारिणी सदस्य श्री. मधुर बर्वे यांनी मान्यवर मार्गदर्शक व सर्व उपस्थितांचे आभार मानले. प्रकाशक संघातर्फे श्री. सुकुमार बेरी, श्री. पराग लोणकर, श्री. जयदीप कडू, श्री. युवराज माळी, श्री. नितीन हिरवे , सौ. वीणा पेशवे आणि श्री देवेंद्र भुजबळ हेही उपस्थित होते. एकूण ही संपूर्ण कार्यशाळा सहभागी व्यक्तींसाठी अतिशय उपयुक्त अशी होती. प्रत्येक सत्र चालू असताना व प्रत्येक सत्रानंतर झालेली प्रश्नोत्तरे व कार्यशाळेत केलेला सराव यामध्ये सर्व सहभागी मंडळींचा उत्स्फूर्त आणि उत्साहाने सहभाग होता.

# संत शिरोमणी नामदेव महाराज : भक्ती, समता आणि लोकजागृतीचा दीपस्तंभ

आषाढ वद्य त्रयोदशी, शके १२७२ हा वारकरी संप्रदायाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. याच दिवशी संत शिरोमणी नामदेव महाराजांनी संजीवन समाधी घेतल्याचे मानले जाते. महाराष्ट्राच्या संतपरंपरेत संत नामदेव महाराजांचे स्थान अत्यंत अढळ आहे. विठ्ठलभक्ती, समता, मानवता आणि लोकजागृतीचा संदेश देत त्यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या भक्ती चळवळीवर अमीट छाप उमटवली.

संत नामदेव महाराजांचा जन्म हिंगोली जिल्ह्यातील नरसी या गावात एका गरीब शिंपी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दामाशेठी आणि आईचे नाव गोनाई होते. आऊबाई ही त्यांची बहीण. वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी त्यांचा विवाह राजाबाई यांच्याशी झाला. पुढे त्यांना चार मुले आणि एक मुलगी झाली. मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा संसार असूनही नामदेव महाराजांचे मन मात्र अखंड विठ्ठलभक्तीत रमलेले होते.

विठ्ठल हेच त्यांचे सर्वस्व होते. देव, आई-वडील, गुरू, सखा, सोयरा आणि स्वामीसर्व काही त्यांच्यासाठी विठ्ठलच होता. त्यांच्या भक्तीची तीव्रता इतकी होती की, विठ्ठल स्वतः त्यांच्या भक्तीला प्रतिसाद देत असे, अशा अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. नामदेवांच्या हट्टामुळे विठ्ठलाने त्यांच्या घरी येऊन दुधाचा नैवेद्य स्वीकारला, अशी भक्तिपरंपरेत प्रसिद्ध कथा आहे.

नामदेवांच्या जीवनातील आणखी एक प्रसंग त्यांच्या सर्वांभूती परमेश्वर पाहण्याच्या वृत्तीचे दर्शन घडवतो. एकदा त्यांच्या घरी आलेल्या कुत्र्याने रिकामी वाटी पळवली. वाटीत काहीच नसल्याचे लक्षात येताच नामदेव महाराज त्या कुत्र्याच्या मागे सुकी भाकर आणि तुपाची वाटी घेऊन धावले. त्या मुक्या जीवाची भूक भागावी, एवढीच त्यांची भावना होती. प्रत्येक जीवामध्ये परमेश्वर आहे, ही जाणीव त्यांच्या आचरणातूनच प्रकट होत होती.

लहानपणापासून विठ्ठलभक्त असलेल्या नामदेव महाराजांनी सत्याचा शोध घेण्यासाठी वेदज्ञ ब्राह्मणांकडे जाण्याचा प्रयत्न केला. मात्र तत्कालीन जातिव्यवस्थेमुळे त्यांना ज्ञानापासून दूर ठेवण्यात आले. ब्रह्मज्ञान जाणून घेण्याचा अधिकार त्यांना नाही, असे सांगण्यात आले. या अनुभवाने ते खचले नाहीत. उलट त्यांनी भक्तीचा मार्ग स्वीकारला आणि स्वतःच्या बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

याच साधनेतून त्यांनी चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तनाचा मार्ग स्वीकारला. समाजातील सामान्य माणसाला सहज समजेल अशा भाषेत त्यांनी सद्विचारांचा प्रसार सुरू केला. लोकांना समजेल, भावेल आणि त्यांच्या जीवनाशी जोडले जाईल अशा पद्धतीने सामूहिक कीर्तनाची परंपरा विकसित करण्यामध्ये नामदेव महाराजांचे मोठे योगदान आहे.

अभंग हा त्यांच्या लोकजागृतीचा प्रभावी माध्यम बनला. त्यांच्या रचनांमध्ये भक्तीबरोबरच जीवनाचे तत्त्वज्ञान, सामाजिक जाणीव, मानवता, संवाद आणि लोकजीवनाचे दर्शन घडते. वारकऱ्यांच्या अत्यंत आवडत्या काल्याच्या कीर्तनाची सुरुवातही नामदेव महाराजांनी केली, अशी परंपरा सांगते.

नामदेव महाराजांनी विपुल साहित्यनिर्मिती केली. त्यांच्या नावावर जवळपास एक कोटी अभंग लिहिल्याची भक्तिपरंपरेतील धारणा आहे. त्यांच्या साहित्याची सर्वांत मोठी ताकद म्हणजे त्याची सहज, सोपी आणि लोकाभिमुख भाषा. ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव यांसारख्या समकालीन संतांच्या तुलनेत नामदेवांच्या रचना आजच्या वाचकालाही सहज समजतात. त्यांच्या लेखनात संवाद आहे, नाट्य आहे, लोकजीवन आहे आणि लोककलांचे विविध रंग आहेत. म्हणूनच त्यांचे साहित्य केवळ भक्तिसाहित्य न राहता लोकसाहित्याचा अमूल्य ठेवा बनले.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीनंतरही नामदेव महाराजांनी भारतभर तीर्थयात्रा केली. रामेश्वरापासून मुलतानपर्यंत त्यांनी देशाचा विस्तृत प्रवास केला. ज्या प्रदेशात गेले, तेथील लोकांशी त्यांनी त्यांच्या भाषेत संवाद साधला. स्थानिक भाषांमध्ये लोककाव्य रचून त्यांनी भक्तीचा आणि मानवतेचा संदेश सर्वदूर पोहोचवला. त्यांच्या या प्रवासामुळे महाराष्ट्रातील भक्तीपरंपरेला देशव्यापी स्वरूप मिळण्यास मोठी मदत झाली.

नामदेव महाराजांचा प्रभाव पंजाबपर्यंत पोहोचला. पंजाबमध्ये त्यांनी दीर्घकाळ वास्तव्य केल्याचे मानले जाते. शीख धर्माच्या गुरु ग्रंथ साहिब या पवित्र ग्रंथात त्यांच्या रचनांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील विठ्ठलभक्तीची परंपरा आणि उत्तर भारतातील भक्तीपरंपरा यांच्यामधील एक महत्त्वाचा दुवा म्हणून संत नामदेवांकडे पाहिले जाते.

संत नामदेवांच्या विचारांचा प्रभाव पुढे उत्तर भारतातील अनेक संतपरंपरांवर पडल्याचे मानले जाते. महाराष्ट्राबरोबरच पंजाब, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आदी प्रदेशांतही त्यांच्याविषयी मोठी श्रद्धा आढळते. विविध ठिकाणी त्यांच्या स्मृती जपणारी मंदिरे आणि धार्मिक स्थळे आहेत.

नामदेव महाराजांचे मोठेपण केवळ त्यांच्या भक्तीत नाही, तर भक्तीला मानवतेशी जोडण्यात आहे. जात-पात, उच्च-नीच, भाषा आणि प्रदेश यांच्या भिंती ओलांडून त्यांनी माणसाला माणूस म्हणून स्वीकारण्याचा संदेश दिला. देव दूर कुठेतरी नसून प्रत्येक जीवामध्ये आहे, ही भावना त्यांच्या अभंगांतून आणि आचरणातून दिसून येते. वयाच्या उत्तरार्धात त्यांनी अत्यंत समाधानाने देह ठेवला, अशी भक्तिपरंपरा आहे. पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या पायरीशी त्यांची समाधी असल्याची श्रद्धा आहे. पंजाबमधील घुमान येथेही त्यांच्या स्मृतीशी जोडलेले पवित्र स्थान आहे. या दोन्ही ठिकाणी भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येतात. आज समाज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीकडे वेगाने वाटचाल करीत असला, तरी जातीयता, द्वेष, भेदभाव, असहिष्णुता आणि सामाजिक विषमता यांसारखे प्रश्न अद्यापही आपल्यासमोर आहेत. अशा काळात संत नामदेव महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. भक्ती म्हणजे केवळ देवपूजा नव्हे; भक्ती म्हणजे माणसावर प्रेम, प्रत्येक जीवाचा सन्मान आणि समाजात समतेची भावना निर्माण करणे,

# महाराष्ट्राला 'इनोव्हेशन हब' बनविण्यासाठी युवा कल्पनांना व्यासपीठ देण्यात येणार– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - वृत्तसेवा**

महाराष्ट्राला 'इनोव्हेशन हब' म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने प्रशासनासमोरील आव्हानांवर नाविन्यपूर्ण उपाय सुचविण्यासाठी युवा प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'द गव्हर्नन्स चॅलेंज टीजीसी २०२६'च्या चौथ्या पर्वाची राज्य शासनाने घोषणा केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. भारतातील राज्य शासन व्यवस्थेवर पहिली राष्ट्रीय प्रशासन केंद्रीत केस स्पर्धा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून देशातील प्रतिभावान युवा विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या नवोन्मेषाच्या भविष्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय सुचविण्याची संधी मिळणार आहे. राज्य शासनाच्या पुढाकाराने, गेट्स फाउंडेशनच्या सहकार्याने आणि समग्र संस्थेच्या आयोजनातून ही स्पर्धा होणार आहे. देशातील ३० नामांकित बिझनेस आणि पब्लिक पॉलिसी संस्थांमधील विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी महाराष्ट्राच्या दीर्घकालीन महत्वाच्या प्राधान्यक्रमांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राला नवोन्मेषाचे प्रमुख केंद्र बनविण्यासाठी उपाययोजना आणि प्रभावी सूचना सुचविणार आहेत. क्षेत्रनिहाय उपाययोजना विकसित करण्यासाठी सहभागी संघांना आरोग्य, कृषी, नागरी विकास, वित्तीय समावेशन, शासन आणि शिक्षण या सहा प्राधान्य क्षेत्रांपैकी एका क्षेत्राची निवड करावी लागणार आहे.नवोन्मेषाच्या क्षेत्रात महाराष्ट्राची वाटचाल विकसित भारत २०४७चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जटिल विकासविषयक आव्हानांवर उपाय शोधणारे, उत्पादकता वाढविणारे आणि नव्या आर्थिक संधी निर्माण करणारे नवोन्मेष आवश्यक आहेत. देशातील सर्वात मोठ्या राज्य अर्थव्यवस्थांपैकी एक असलेले महाराष्ट्र मजबूत औद्योगिक पाया, सक्षम वित्तीय परिसंस्था, जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था, विकसित होत असलेली स्टार्टअप परिसंस्था आणि उद्योजकतेची संस्कृती यामुळे या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यासाठी सक्षम आहे. राज्यातील नवोन्मेष परिसंस्था अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवोन्मेष धोरण २०२५ अंतर्गत पुढील पाच वर्षांत ५० हजार स्टार्टअप्सना मान्यता देणे आणि १.२५ लाख उद्योजकांना प्रोत्साहन देणे, हे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य नवोन्मेष सोसायटी, ₹५०० कोटींचा मुख्यमंत्री महाफंड, नवी मुंबईतील प्रस्तावित महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी, तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स आणि मानवरहित प्रणालींसाठीच्या स्वतंत्र राज्य धोरणांमुळे नवोन्मेषाधारित विकासासाठी भक्कम पायाभूत व्यवस्था निर्माण होत आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'च्या व्यापक दृष्टिकोनाला पुढे नेत टीजीसी २०२६च्या माध्यमातून देशातील युवा प्रतिभांची सर्जनशीलता, विश्लेषणात्मक क्षमता आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन यांचा उपयोग करून महाराष्ट्राच्या नवोन्मेषाच्या वाटचालीला अधिक वेग देणाऱ्या धाडसी आणि परिणामकारक कल्पना शोधण्यात येणार आहेत. तीन टप्प्यांत होणार स्पर्धा 'द गव्हर्नन्स चॅलेंज २०२६' ही स्पर्धा दोन महिन्यांच्या कालावधीत तीन टप्प्यांत होणार आहे. सहभागी ३० संस्थांमधील विद्यार्थी संघ आपले प्रोजेक्ट सादर करतील. त्यांचे मूल्यांकन झाल्यानंतर प्रत्येक संस्थेतील एक विजेता संघ पुढील टप्प्यासाठी पात्र ठरेल.

# विप्र फाउंडेशन महिला प्रकोष्ठाची 'श्रावण सहल' उत्साह व आनंदात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

पवित्र श्रावण मासाच्या मंगल पर्वानिमित्त विप्र फाउंडेशन महिला प्रकोष्ठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पारिवारिक स्नेह मिलन कार्यक्रम 'श्रावण सहल२०२६' हा गोकुळ ॲग्रो टुरिझम अँड पिकनिक सेंटर, नंदापूर, जालना येथे हर्षोल्हास व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.श्रावण महिन्याची आध्यात्मिकता, कौटुंबिक आत्मीयता आणि सामाजिक सौहार्द यांचा सुंदर संगम साधत आयोजित करण्यात आलेल्या या सैरचा मुख्य उद्देश महिला, कुटुंबीय व समाजबांधवांना दैनंदिन धावपळीतून काही क्षण निवांतपणे एकमेकांसोबत आनंदाने घालवता यावेत तसेच सामाजिक एकोपा अधिक दृढ व्हावा, हा होता. कार्यक्रमात




महिला व मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत दिवसभर विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचा आनंद घेतला.

यावेळी मुलांसाठी इनडोअर व आउटडोअर गेम्स, टर्फ, वॉटर ॲक्टिव्हिटीज तसेच स्विमिंग पूल अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मुलांनी खेळ व जलक्रीडांचा मनमुराद आनंद घेतला, तर महिलांनीही विविध मनोरंजक खेळ व उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते हरियाली तीज उत्सव. महिला प्रकोष्ठाच्या वतीने हरियाली तीजच्या निमित्ताने विशेष आयोजन करण्यात आले होते. महिलांनी पारंपरिक उत्साह व उमंगात तीज सण साजरा करत एकमेकींना शुभेच्छा दिल्या. यावेळी संपूर्ण परिसरात आनंद, स्नेह, सौहार्द आणि कौटुंबिक आपलेपणाचे मनमोहक वातावरण निर्माण झाले होते.

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते.

विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# संघटन मजबूत करण्यासाठी शिवसेना कार्यकर्त्यांना निश्चित बळ देणार : राज्यमंत्री आशिष जैस्वाल

## बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची संवाद व आढावा बैठक उत्साहात

**बदनापूर - प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यासह संपूर्ण जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांना निश्चित बळ दिले जाईल. गाव, वाडी-वस्तीपासून बूथ पातळीपर्यंत संघटना सक्षम करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून सातत्याने जनसंपर्क वाढवावा, असे आवाहन राज्याचे राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल यांनी केले.बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची संवाद व आढावा बैठक गुरुवारी (ता. ६) बदनापूर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात उत्साहात पार पडली. यावेळी राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल, शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, संपर्कप्रमुख ए. जे. बोराडे यांच्यासह शिवसेना, युवासेना व विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना आशिष जैस्वाल म्हणाले की, प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात पक्षाची भूमिका तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावी.



केवळ निवडणुकीपुरता जनसंपर्क मर्यादित न ठेवता वर्षभर जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळेच पक्षाची संघटना मजबूत होत असते. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवून संघटन विस्तारण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले.''शिवसेना कार्यकर्त्यांच्या पाठीशी वरिष्ठ नेतृत्व ठामपणे उभे राहील. कार्यकर्त्यांना आवश्यक ते बळ देण्यासाठी आपण निश्चितपणे पुढाकार घेऊ,'' अशी ग्वाहीही जैस्वाल यांनी दिली. तसेच ''तूच आहेस तुझ्या भविष्याचा शिल्पकार'' हा प्रेरणादायी मंत्र देत कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने संघटनात्मक कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीच्या प्रास्ताविकात शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगितले. जिल्ह्यात पक्षाचे संघटन विस्तारत असून कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आहे. मात्र, महायुतीच्या माध्यमातून आपण सत्तेत असताना विकासकामे व शासकीय योजनांच्या बाबतीत मित्रपक्षांतील काही लोकप्रतिनिधींकडून शिवसेना कार्यकर्त्यांना दुजाभावाची वागणूक मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शिवसेनेच्या वाढीसाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने मेहनत घेतली आहे. त्यामुळे विकासकामे, शासकीय योजना आणि स्थानिक प्रश्नांच्या बाबतीत शिवसेना कार्यकर्त्यांना योग्य स्थान व सन्मान मिळणे आवश्यक आहे.

---

## छत्रपती संभाजीनगरात १४ ते १६ ऑगस्ट देशभरातील कारागीर, उद्योजक आणि हस्तकलेचा भव्य मेळावा

### *हस्तकला, हातमाग,स्वदेशी उत्पादनाचे सागर रिसॉर्ट मध्ये प्रदर्शन*

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी** : भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या ( एमएसएमई) सहकार्याने शिखाज कारागीरी या संस्थेच्या समन्वयात स्वदेश फॅशन व लाईफस्टाईल एक्सपो २०२६ ( २०२६ )या भव्य हस्तकला मेळाव्याचे आयोजन छत्रपती संभाजीनगरात करण्यात आले आहे.

१४ ते १६ ऑगस्ट २०२६ दरम्यान सागर रिसॉर्ट्स येथे होणाऱ्या या प्रदर्शनात देशभरातील स्वदेशी उत्पादने, हस्तकला, हातमाग, फॅशन आणि लाइफस्टाइल उत्पादनांचे वैविध्य अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. या प्रदर्शनात १०० हून अधिक पुरस्कारप्राप्त कारागीर, एमएसएमई उद्योग, स्टार्टअप्स, महिला उद्योजिका, हातमाग व हस्तकला उत्पादक, 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' उपक्रमातील उद्योजक, सहकारी संस्था तसेच विविध लाइफस्टाइल ब्रँड सहभागी होणार आहेत. ट्रॅक्टर खादी आणि ग्रामोद्योग आयोग (), नॅशनल ज्यूट बोर्ड यांसह केंद्र व राज्य शासनाशी संबंधित संस्थांचेही या उपक्रमाला सहकार्य लाभणार आहे.

भारताच्या विविध प्रांतांतील पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक उद्योजकतेचा अनोखा संगम या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे.चोखंदळ ग्राहकांना शैलीदार निवडीसाठी हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.त्यामुळे मराठवाड्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कारागिरी म्हणजे केवळ एखादी वस्तू तयार करण्याचे कौशल्य नव्हे; तर पिढ्यान्‌पिढ्या जपलेली कला, परंपरा, कल्पकता आणि स्थानिक ज्ञानाचा अमूल्य वारसा होय. अशा देशातील विविध राज्यातील कुशल कारागिरांनी तयार केलेल्या हस्तकला व हातमाग उत्पादनांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे, एमएसएमई आणि महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे तसेच भारतीय स्वदेशी उत्पादनांची व्याप्ती वाढविणे, हा या प्रदर्शनामागील महत्त्वाचा उद्देश आहे.

'आत्मनिर्भर भारत', 'व्होकल फॉर लोकल' आणि 'मेक इन इंडिया'च्या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीची जोड देणारे हे व्यासपीठ ठरणार आहे.त्यामुळे देशभरातील कारागिरांच्या हस्तकलेला,पारंपारिक कारागिरीला चालना देण्यासाठी एकदा सागर रिसॉर्ट्सला भेट देऊन या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे प्रदर्शनामुळे विविध भागांतील प्रतिभावान कारागिरांना आपली उत्पादने आणि कौशल्य मोठ्या ग्राहक वर्गासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे.छत्रपती संभाजीनगरच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक भूमीवर साकारत असलेला हा स्वदेशीचा भव्य उत्सव कारागिरी, उद्योजकता आणि भारतीय *(पान २ वर)*

## स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी प्रशासनाची पूर्व तयारी

### विभागीय आयुक्त कार्यालय प्रांगणात पालकमंत्री करणार ध्वजारोहण

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापनदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते होणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय राखून परिपूर्ण तयारी करावी, असे निर्देश सहआयुक्त (साप्रवि) मंजुषा मिसकर यांनी दिले.

स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांच्यासह महसूल, गृह विभाग, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, माहिती विभाग आदी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

---

## न्यायालयाची प्रतिष्ठा राखणे ही पक्षकारांचीच नैतिक जबाबदारी; जालन्यातून राज्य व देशव्यापी जनजागृती मोहिमेचा प्रारंभ

### एम.एस.एस. लॉ कॉलेजमध्ये आज सकाळी ११ वाजता पहिला कार्यक्रम

**जालना - प्रतिनिधी**

देशाच्या सर्वोच्च न्यायालयात अलीकडच्या काळात घडलेल्या धक्कादायक घटनांनी न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेला आव्हान दिले आहे. या पार्श्वभूमीवर, ''न्यायाधीशांनी औदार्य दाखवून क्षमा केली तरी न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा राखणे ही पक्षकारांचीच नैतिक जबाबदारी आहे,'' असा संदेश देत जालन्यातून मराठवाडा लिटिगंट्स असोसिएशनतर्फे राज्य व देशव्यापी न्यायालयीन सभ्यता व शिष्टाचार जनजागृती मोहिमेचा प्रारंभ करण्यात येत आहे. या मोहिमेचा पहिला प्रबोधनात्मक कार्यक्रम उद्या, ११ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता जालन्यातील एम.एस.एस. लॉ कॉलेज येथे पार पडणार आहे.या कार्यक्रमात राष्ट्रीय वक्त्या ॲड. औम्महेश्वरी जाधव या मुख्य वक्त्या म्हणून उपस्थितांशी संवाद साधतील. याप्रसंगी जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची विशेष उपस्थिती लाभणार असून, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. परमेश्वर गाडगीळ हेदेखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तसेच एम.एस.एस. लॉ कॉलेजच्या प्राचार्य डॉ. शेख तरन्नुम युसूफ या कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.मराठवाडा लिटिगंट्स असोसिएशनचे प्रकल्प अध्यक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, ही मोहीम सर्वप्रथम विधी महाविद्यालयांतून सुरू करण्यात येत आहे, कारण उद्याचे वकील आजच घडवणे गरजेचे आहे. भावी पिढीच्या मनात न्यायव्यवस्थेबद्दल आदर व शिस्तीचे संस्कार रुजले, तरच खऱ्या अर्थाने बदल घडेल. न्यायाधीश व न्यायालयीन कर्मचाऱ्यांवर असलेला कामाचा प्रचंड ताण लक्षात घेता, व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कायम राखणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.असोसिएशनचे अध्यक्ष सीए गोविंदप्रसाद मुंदडा, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. बळवंत नाईक, सचिव नरेंद्र मोदी, उपाध्यक्ष विजय बागडिया, राजकुमार दायमा व जगदीश वासुदेव अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम जालन्यातून सुरू होऊन मराठवाडा, संपूर्ण महाराष्ट्र आणि पुढे देशपातळीवर टप्प्याटप्प्याने राबवली जाणार आहे. *(पान २ वर)*

## विभागीय माहिती कार्यालयात सहाय्यक संचालकपदी सुरेश पाटील रुजू

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक (वर्ग-२, राजपत्रित) पदावर सुरेश पाटील रुजू झाले. उपसंचालक प्रवीण टाके यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. विद्यमान सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांची जिल्हा माहिती अधिकारी, पुणे येथे बदली झाल्याने रिक्त झालेल्या पदावर पाटील यांनी फुंदे यांच्याकडून पदभार स्वीकारला.उपसंचालक प्रवीण टाके यांच्या मार्गदर्शनात ते काम करणार आहेत. सहाय्यक संचालकपदी रुजू होण्यापूर्वी पाटील हे शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. या सेवाकाळात त्यांनी जळगाव आणि अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभारही सांभाळला. सुरेश पाटील यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. दैनिक सकाळ, पुढारी आणि सायं दैनिक लोकमान्य सांजवर्ता या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी बातमीदारी केली आहे.याशिवाय प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक यांच्या कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते. छत्रपती संभाजीनगर विभागातील वृत्त व माहितीसाठी त्यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ७०२८५८६९१९ वर संपर्क साधता येईल.

## विना रॉयल्टी अवैध वाळू वाहतूक ; टेंभुर्णी पोलिसांची कारवाई, ५ लाखांचा ट्रॅक्टर जप्त

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी - विना रॉयल्टी अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टर चालकावर टेंभुर्णी पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत अंदाजे ५ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ०९ ऑगस्ट २०२६ रोजी पहाटे ०२.०५ वाजेच्या सुमारास मौजे टेंभुर्णी ते जाफ्राबाद रोडलगत मदिना मशिदी समोर संशयितरित्या वाळू वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खार्डे व त्यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला असता,



एक सोनालिका कंपनीचा ४२ मॉडेलचा ट्रॉलीसह ट्रॅक्टरमध्ये सुमारे ०१ ब्रास वाळूची अवैध वाहतूक होत असल्याचे आढळून आले.

चालकाकडे वाळू वाहतुकीसाठी लागणारी शासनाची रॉयल्टी पावती किंवा कोणताही वैध परवाना नसल्याने पोलिसांनी ट्रॅक्टर व वाळू असा एकूण ५,०६,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस ठाणे टेंभुर्णी येथे गुरनं १३३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) सह खान व खनिज अधिनियम कलम ३ व ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी चालक सलमान पठाण रा. दत्तनगर टेंभुर्णी याला ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.हे.कॉ. ११४७ देशपांडे हे करीत असून, गुन्हा पोहेका १२३० चौधरी यांनी दाखल केला आहे. टेंभुर्णी परिसरात अवैध वाळू उपशामुळे शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत असून पोलिसांनी अशा अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

---

## जाफराबादेत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केले भारुड, भजन, गवळण गायन

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी - केंद्र व राज्यातील सत्ताधारी - महायुती सरकारने धर्म व - जातीच्या मुद्द्यांवर समाजात भेद निर्माण करून निवडणुका जिंकल्या. मात्र, निवडणुकीपूर्वी -दिलेल्या आश्वासनांचा सत्तेत आल्यानंतर विसर पडला, असा - आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष - कल्याण दळे यांनी केला. दरम्यान, - या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी राम - मंदिरातील चोरी प्रकरणात जाफराबाद येथे काँग्रेसच्या सत्ताधाऱ्यांना सद्बुद्धी देण्यासाठी - भजन, भारुडाचे गायन केले.



- पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या - आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय बनकर, पर्यावरण - विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश - गवळी, ज्येष्ठ नेते सुरेश वाकडे, - ज्ञानेश्वर शिंदे, माजी सरपंच - नासिरखाँ पठाण, बदर चाऊस, - शहराध्यक्ष मेहबूब पठाण, नितीन - गौतम, जावेद सिद्दिकी, हरुण पठाण, प्रमोद फदाट, मुरलीधर भोपळे, भरत अंभोरे, शे. मस्जिद, राजाभाऊ कुलकर्णी, शांतीलाल बनसोडे, विनोद सुरडकर आदी उपस्थित होते. दळे म्हणाले की, वाढती महागाई, गॅस, पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त आहेत. युवकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडेही सरकारचे पुरेसे लक्ष नसल्याचा आरोप त्यांनी केला. सार्वजनिक व शासकीय मालमत्ता विकण्याचा सपाटा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर त्यांनी टीका केली. काँग्रेस *(पान २ वर)*

## तालुक्यातील वीज समस्यासाठी मनसे नेत्यांना निवेदन

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी - ग्रामीण भागातील विजेच्या समस्या वाढत असल्याने छत्रपती संभाजीनगर येथे दोन दिवसीय दौऱ्यावर आलेले मनसे नेते बाळा नांदगावकर यांची आज सुभेदारी गेस्ट हाऊस येथे भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.यावेळी शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदनही देण्यात आले. महावितरण मार्फत मराठवाड् यातील शेतातील सिंगल फ्युज लाईट बंद केली जात आहे. जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुका बंद झालेला आहे, शेतातील वाड्या, वस्त्या, तांडा यांना रात्री सिंगल फ्युज



लाईट चालू ठेवणे बाबतची विनंती निवेदन द्वारे करण्यात आली. मराठवाड्यातील शेतातील सिंगल फ्युज लाईट बंद केली जात आहे. जालना जिल्ह्यात तीच परिस्थिती निर्माण झाली आहे.जालना जिल्ह्यातील सर्व शेतातील वाड्या, वस्त्या, तांडा या ठिकाणची सिंगल फ्युज लाईट बंद केली आहे. अनेक शेतकरी आपल्या सोयीनुसार शेतात राहण्यासाठी गेले आहेत शेतकऱ्यांनी आपल्या वस्तीवर रोहित्र बसवून मीटर घेतलेले आहे. महावितरण चे कर्मचारी ग्राहकांना न सांगता जुने मीटर घेऊन गेले व स्मार्ट मिटर बसवले त्यामुळे येणारे जास्तीचे वीज बील तेथील शेतकरी भरत आहे. असे असूनही एक फ्युज रात्रीला दहा वाजता सोडतात सकाळी सहा वाजता बंद करतात. त्यामुळे शेतातील वाड्या, वस्त्या, तांडा येथे राहणा-या नागरीकांना रात्री अंधारात रहावे लागत आहे. हा एक प्रकारचा त्यांच्यावर अन्याय होत आहे. महावितरणने घेतलेला हा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. तरी शेतकऱ्यांची मागणी आहे की, किमान सायंकाळी पाच ते सकाळी सहा पर्यंत सिंगल फ्युज *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.